facebook - navprahar2023 | navprahar2023 | navprahar2023@gmail.com | www.navprahar.com

RNI Regn no. MAHBIL/2013/54875    Post Regd. No. ATI/RNP/3337/2019-2021

साप्ताहिक
# नव प्रहार
भ्रष्ट व्यवस्थेवर लेखणीचा दणका

Social Media Edition

मुख्य संपादक :- संजय पांडे    मो.८५५२९५८५५५    navprahar2023@gmail.com

शनिवार, दि. ३.६.२०२३

# बोरा एप्स के चक्रब्युह में फसती जा रही है भंडारा की जनता




■ 40 दिन में निवेश रक्कम दुगुनी करने का दिखाया जा रहा सब्जबाग

■ हर दिन मिलनेवाले 3 प्रतिशत ब्याज की लालच में युवाओका आकर्षण ज्यादा

**महिला तथा छोटे व्यवसायी भी हो रहे आकर्षित**

**युवा बाहर से रकम लेकर लगा रहे इस एप में**

**ऐसे लुभावने वादों से दूर रहने की एस्पर्ट की सलाह**




*भंडारा ( प्रतिनिधि )- एक कहावत है दुनिया मे जब तक बेवकूफ जिंदा है अक्लमंद भूखे नही मरते % कुछ ऐसा ही नजारा इन दिनों भंडारा शहर तथा आसपास के देहातो में देखने को मिल रहा है. शहर तथा आसपास की जनता बोरा एप्स के पीछे दीवानी होती दिख रही है. लोग इस एप्स के पीछे इस कदर पागल है की लोग खासकर युवा वर्ग बाहर से ब्याज पर पैसे लाकर उन्हें इस एप में लगा रहे है. तो आइए जानते है क्या है बोरा एप्स , सुविज्ञ सूत्रों द्वारा मिली जानकारी के मुताबिक यह एप सिंगापूर का होने की बात कही जा रही है. यह एप आपके निवेश पर रोजाना 3त्न ब्याज देने का कहता है. यानी आप ने इसमें 5 हजार रुपये निवेश किए तो आपको रोजाना 150 रु. ब्याज मिलता रहेगा. इतना ही नही तो अगर आप करीबी व्यक्ति को इसमें निवेश करने के लिए कहते हो तो आपको उसपर भी लाभ मिलेगा.*

40 दिनों में रकम दुगुनी करने का दिखाया जा रहा सब्जबाग - इस एप्स के ?रिए निवेश करनेवाले निवेशकों को एक ओर मिलनेवाले रोजना 3त्न ब्याज और 40 दिनों में रकम दुगुनी करने के दिखाए जा रहे सब्जबाग की वजह युवा वर्ग , छोटे व्यवसायी यहां तक कि हाउसवाइफ तथा मजदूरी करनेवाली महिलाए भी इस लालच के मक ?जाल में फसती जा रही है.

युवा दोस्त भाई यहाँ तक कि निजी साहूकारों से रकम ब्याज पर लेकर कर रहे निवेश - सूत्रों द्वारा मिली जानकारी के मुताबिक इन निवेशकों में युवा वर्ग की तादाद ज्यादा है.तथा वह निवेश भी पूरी ताकद के साथ कर रहे है. ज्यादा ब्याज तथा 40 दिनों में रकम दुगुनी होने के लालच के चलते यह दोस्तभाई, रिश्तेदार तथा निजी साहूकारों से रकम ब्याज पर लेकर इस बोरा एप्स के मायाजाल में कथित तौर पर फसते जा रहे है.

खुद तो खुद करीबियों को भी कथित तौर पर फसा रहे है इस मक ?जाल में - कहते है कि लालच एक बुरी बला है. जो भी लालच करता है वह एक नया एक दिन आंसू जरूर बहाता है. इस एप्लिकेशन के बारेमे में भी यही कहा जा रहा है. पर लालच में अंधे हुए इंसान को सही और झुंड में का फर्क समझ नही आता यही बात इस एप्लिकेशन में देखने को मिल रही है. लालच के चलते इस चक्रब्युह मे फास चुका इंसान उसके नीचे जु ?ने वाले व्यक्ति पर उसे मिलनेवाले कमीशन के लालच में करीबी रिश्तेदार जान पहचान वालो को जो ?ने की सलाह दे रहा है.

क्या कहते है एस्पर्ट इस विषय मे - हमने जब बाजार में निवेशकों को निवेश के लिए सुझाव देनेवाले एस्पर्ट से इस विषय मे जानना चाहा तो उनका दो टूक जबाब था कि यह एक छलावा है. 40 दिनों में रकम दुगुनी तथा रोजाना 3 त्न ब्याज यह % मृगजल % की भांति है. गर्मी के दिनों में दूर से पानी होने का एहसास तो होता है. पर उसकी तलाश में मिलो चले जाएं तो भी उसे हासिल नही किया जा सकता.

चवन्नी दिखाकर रूपया छीन लेनेवाली बात - निवेश को लेकर अच्छा खासा तजुर्बा रखनेवाले विशेषज्ञों से जब हमने इस विषय को लेकर उनकी राय जाननी चाही तो उनका साफ कहना था कि यह कथित योजना नेटवर्क मार्केटिंग की जैसी है. सुरवात के लोगो को इस योजना का जमकर लाभ मिलता है. जिसे देखकर उसके चेन में काम करनेवाले जोश जोश में खुद भी जरूरत से ज्यादा मेहनत कर लेते है. पर उनके नीचे के लोग जब कुछ नही करते तो उनकी मेहनत पर पानी फिर जाता है. सिधे तौर पर कहा जाए तो यह चवन्नी देकर रुपया हथियाने वाली बात है.

सायबर सेल द्वारा इस ओर ध्यान देने की सख्त जरूरत - जबसे ऑनलाइन व्यवहारों में इजाफा हुआ है तबसे ऑनलाइन ठगी के मामले में भी बेतहाशा ब ?तरी हुई है. एक बार अगर आपके खाते से रकम चली जाए तो उसे वापस पाना लगभग असंभव हो जाता है. इस मामले भी कुछ ऐसेही आसार दिखाई दे रहे है. अगर यह अप्लिकेशन कल चलकर बंद हो जाता है तो जनता अपना पैसा वापस पाने किसके पास जाएगी . क्योंकि जो लोग इस एप्लिकेशन में अपना पैसा लगा रहे है उन्हें यह भी पता नही की यह एप्लिकेशन कहा कि है ? वजह जो बुद्धिजीवी आसपास की जनता को लालचरूपी दलदल में फसता देख रहे है उनका कहना है की इस मामले में जल्द से जल्द सायबर पुलिस ने ध्यान देना चाहिए.

पुलिस विभाग से जनता को है उम्मीद - सरकारी विभागों में पुलिस विभाग एक ऐसा विभाग है जो जनता के संपर्क में रहता है.तथा जनता इस विभाग से घबराती भी है. अगर पुलिस विभाग इस ओर ध्यान दे तो भंडारा जिले की जनता को इस दलदल में फसने से बचाया जा सकता है ऐसा कुछ बुद्धिजीवियों का कहना है.

खुद का सर पीटना रहा गया बाकी - जो लोग यह जानते है कि इस मामले का हश्र बेहद ही खतरनाक रहने वाला है.वह करीबी लोगो को इस मक ?जाल में फसने से बचाने की पुरजोर कोशिश कर रहे है. पर लालच का भूत इन लोगो के दिमाख पर इस कदर सवार है कि इन्हें लालच के चलतेअच्छे बुरे की भी पहचान नही रही है. वह करीबियों को समझा समझा कर थक चुके है.

# आंटी महिलांना पैशाचे आमिष देऊन करवून घेत होती तसले काम !

## पोलिसांना माहिती मिळताच टाकला छापा

**लातूर / नवप्रहार न्यूज नेटवर्क**

लातूर शहरातील एमआयडीसी पुईस ठाण्याच्या हद्दीतील एका घरात बाहेर गावातून महिलांना बोलावून आणि त्यांना पैशाचे आमिष देवुन त्यांच्या कडुन घरातच वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. पोलिसानी डमी ग्राहक पाठवून खात्री करून घेता कारवाई केली. एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लातुरात एक महिला पैशाचे आमिष दाखवून बाहेरगावाहून महिलांना बोलावून घेत आपल्या राहत्या घरातच देहविक्री व्यवसाय चालवत असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्याकडून मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस पथकाने एक डमी ग्राहक पाठवून घरातच सुरु असलेल्या कुंटणखान्याची खात्री केली. त्यानंतर या कुंटणखान्यावर अचानकपणे छापा मारला. यावेळी आंटीसह अन्य दोन महिलांना पोलिसांनी ताब्यात घेत झाडाझडती घेतला. यावेळी पीडित महिलांनी सांगितले, की पैशांचे आमिष दाखवून स्वत:च्या फायद्यासाठी देहविक्री करुन घेतले जात आहे. त्यांनतर कुंटणखाना चालवणाऱ्या एका आंटीला पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून मोबाईल आणि रोख रक्कम असा 10 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलिसांकडून लातूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम 1959 कलम 3,4,5 प्रमाणे गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर ही कारवाई पोलीस नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक शिरसाट, मपोउपनि श्यामल देशमुख, पोह. सदानंद योगी, मोना सुधामती वंगे, लता गिरी, वाहन चालक बुडे यांच्या पथकाने केली. तसेच पुढील तपास पोलीस निरीक्षक गोरख दिवे करीत आहेत.

पोलिसांनी डमी ग्राहक पाठवला अन् झाला भांडाफोड

गेल्या काही दिवसांपासून एक महिला लातूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरात देहविक्रीचा व्यवसाय करत होती. विशेष म्हणजे पैशाचे आमिष दाखवून बाहेरगावाहून महिलांना बोलावून घेत देहविक्रय व्यवसाय करण्यासाठी अंटी भाग पाडायची. दरम्यान याची माहिती पोलिसांना खबऱ्याकडून मिळाली. त्यामुळे पोलिसांनी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. पण प्रत्यक्षात देहविक्रीचा व्यवसाय सुरु असल्याची खात्री करण्यासाठी पोलिसांनी आधी डमी ग्राहक पाठवला. या डमी ग्राहकाने आतमध्ये जाऊन संपूर्ण खात्री करत पोलिसांना इशारा दिला. खात्री होताच पोलिसांच्या पथकाने अचानकपणे छापा मारत आंटीला ताब्यात घेतले. तसेच या प्रकरणी गुन्हा देखील दाखल केला आहे.

# पतीने पत्नीबद्दल घेतला असा निर्णय की सगळेच झाले हैराण

## ■ कोणी केले कौतुक तर कोणी ठेवले नाव ■

**पलामु ( झारखंड )/ नवप्रहार न्यूज नेटवर्क**



लग्न हा प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यातला आनंदाचा क्षण असतो. प्रत्येक व्यक्ती मग तो पुरुष असो वा स्त्री आपल्या लग्नाची आणि भविष्याची स्वप्ने इनगवत असतात. पण लग्नाला 20 दिवस झाले असतांना जर पतीला हे समजले की लग्नागोदार पत्नीचे अन्य कोणावर प्रेम होते. आणि ती आजही त्याच नात्यात गुरफटली आहे. तर अश्या वेळी पत्नीचा राग येणे आणि तो राग तिच्यावर निघणे स्वाभाविक आहे . पण आम्ही आपणाला आता ज्या पतीबद्दल सांगणार आहोत त्याने जे केले ते वाचून तुम्ही सुद्धा त्याचे कौतुक कराल.

पलामु जिल्ह्याच्या बिचकिल्ला गावात राहणाऱ्या मनोज कुमार सिंह याचे लग्न प्रियांका सोबत 10 मे रोजी झाले होते. लग्नानंतर नववधू आणि नवरा हे वेगळ्याच आनंदात असतात. पण प्रियांका ही उदास राहत होती. हसणे तर दूर ती कोणाशी काही बोलत नव्हती. मॅनेज याने तिला विचारले असता तिने तिचे जितेंद्र नामक युवकर प्रेम असल्याचे सांगितले. आणि ही बाब तिने कुटुंबियांना सांगितली होती. पण त्यांनी जबरदस्ती त8चे लग्न लावून दिल्याचे मनोज ला सांगितले. पुढे सगळे काही योग्य होईल म्हणून मनोज आशेवर होता. पण एकेदिवशी तो शेतातून घरी परतत असताना त्याला कळले की त्याची बायको प्रियकर जितेंद्र सोबत पळून जात असताना गावकऱ्यांनी त्यांना पकडून ठाण्यात नेले आहे तर त्याने थेट ठाणे गाठले आणि पोलिसांना काही कळू देण्याच्या आत तिचा हात प्रियकराच्या हातात दिला. हे पाहून सगकेच हैराण झाले. तेव्हा त्याने उपस्थितांना सांगितले की त्याच्या बायकोने त्याला सगळे काही सांगितले आहे. ती आणि तिचा प्रियकर हे मागील 10 वर्षांपासून रिलेशनशिप मध्ये होते. आणि हे प्रियंकाच्या कुटुंबियांना माहीत होते पण जात आडवी येत असल्याने घरच्यांचा या लग्नाला विरोध होता. त्याच्या म्हणण्यानुसार त्याने जर प्रियंका सोबत जास्त दिवस संसार केला तर ना ती सुखी राहील ना तो. त्यामुळे कुटुंबात कलह वाढेलती जितेंद्र सोबत जास्त खुश राहील म्हणून तिला त्याच्या सोबत जाऊ देणेच योग्य. त्याच्या या निर्णयामुळे कोणी त्याचे कौतुक केले तर कोणी नाव ठेवले. मिया बीबी राजी असल्याने पोलिसांनाही गपगुमान राहावे लागले.

# तीन लोकांच्या ‘त्या’ कृत्यामुळे राज्यात गाजतेय भंडाऱ्याचे नाव?

## भंडाऱ्यात देखील खात रोड मार्गावरिल एका क्लबमध्ये सदर कृत्य चालत असल्याची नागरिकांमध्ये...

**भंडारा ( विशेष प्रतिनिधी )**- नागपूर जिल्ह्याअंर्तगत येणाऱ्या उमरेड तालुक्यातील करहाडला अभयारण्याच्या पायथ्याशी असलेल्या % द टायगर पॅराडाईस रिसोर्ट आणि वॉटर पार्क मध्ये 30 मे च्या मध्यरात्री गुन्हे शाखेकडून करण्यात आलेल्या कारवाईत भंडारा येथील तीन महानुभावांच्या उपस्थितीमुळे भंडारा शहराचे नाव राज्यात गाजत असुन, या महाभागांच्या कृत्याची भंडारा शहरासह जिल्ह्यात खमंग चर्चा सुरु असुन, भंडाऱ्यात देखील भंडारा- रामटेक- खात रोड मार्गावरिल एका क्लबमध्ये तशाच प्रकारचे सदर कृत्य चालत असल्याची सुत्राची माहीती आहे.

मंगळवार दिनांक 30 मे 2023 च्या रात्री उमरेड एलसीबी (स्थानिक गुन्हे शाखेला) मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी % द हॉटेल टायगर पॅराडाईस रिसॉर्ट अँड वॉटर पार्क % मध्ये धाड टाकली असता, तेथे तरुणी तोकड्या कपड्यात अश्लील नृत्य करीत असल्याचे दिसून आले. सोबत दारू देखील सर्व्ह केल्या जात असल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी कायदेशीर कारवाई करत 6 तरुणीसह अश्लील नृत्याचा व दारूचा आस्वाद घेत असलेल्या 12 लोकांना पोलिसांनी ताब्यात घेवून अटक केली.

**आरोपीमध्ये भंडाऱ्यातील 3 महानुभावांचा समावेश**- या गैरकृत्यात भंडारा येथील डॉ. गोपाल सत्यनारायण व्यास (48) रा.तकीया वार्ड, ललित नंदलाल बैस (50),खात रोड व अभय रमेश भागवत (49) रामायण नगरी, खात रोड भंडारा यांचा समावेश आहे.




**भंडारा शहराच्या नावाचा राज्यात डंका** - भंडारा शहरात होणाऱ्या विविध उपक्रमाच्या आयोजनाचे तसेच अन्य कारणाने भंडारा शहर आणि जिल्ह्याचे नाव राज्य पातळीवर नेहमीच चर्चेत असते. परंतु या तिन महाभागांनी भंडारा शहराला एका वेगळ्या क्षेत्रात अनोखी ओळख मिळवून दिल्याने भंडारा शहराच्या नावाचा राज्यात डंका वाजला आहे.

**खुफिया विभागाने लक्ष देण्याची गरज** - सुत्राच्या माहीतीनुसार भंडारा शहरालगतील एका क्लबमध्ये सुद्धा उमरेड तालुक्यातील कराडला अभयारण्याच्या पायथ्याशी असलेल्या द टायगर पॅराडाईस रिसॉर्ट आणि वॉटर पार्क येथे सुरू असलेल्या अश्लील कृत्यांसारखे प्रकार चालत असल्याची माहीती लक्षात घेता, यावर आळा घालण्याची जबाबदारी ही पोलीस विभागाची असुन,पोलिसांच्या खुफिया विभागाने विशेष लक्ष ठेवण्याची आवश्यकता असल्याचे परिसरातील नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे. जर का भंडारा शहर व जिल्हयात सदर प्रकार सुरु असेल ? तर पोलीस विभाग करतो तरी काय ? हा प्रश्न जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

# ओडिशा रेल्वे अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना मिळणार 12 लाख

**नवी दिल्ली** - ओडिशा रेल्वेअपघातानंतर अद्यापही बचावकार्य सुरू आहे. बचाव आणि मदत कार्यात अनेक जखमींना कटक, भुवनेश्वर आणि बालासोर येथील रुग्णालयात हलविण्यात येत आहे. यासंदर्भात माहिती देताना, अपघातात 237 जणांचा मृत्यू झाला असून 900 जण जखमी झाले असल्याची पुष्टी ओडिशाचे मुख्य सचिव प्रदीप जेना यांनी केली आहे. हा भीषण अपघात शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडला. यात मालगाडी, हावडा एक्सप्रेस आणि कोरोमंडल एक्सप्रेस एकमेकांना धडकल्या. अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना पंतप्रधानांकडून दोन लाख रुपये, तर रेल्वे मंत्रालयाकडून 10 लाख रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

ओडिशात झालेल्या या भीषण अपघातात 237 जणांचा मृत्यू झाला आहे. रेल्वे मंत्रालयाकडून मृतांच्या



नातलगांना नुकसानभरपाईची रक्कम जाहीर करण्यात आली आहे. या अपघातातील मृतांच्या नातलगांना प्रत्येकी 10 लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. याचबरोबर या अपघातात गंभीर जखमी झालेल्यांना दोन लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. यासंदर्भात बोलताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, हा अपघात दुर्दैवी असून अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातलगांना प्रत्येकी 10 लाख रुपये, गंभीर जखमींना 2 लाख रुपये, तर किरकोळ जखमी झालेल्यांना 50,000 रुपयांची मदत दिली जाईल.